**पाहिजेत**
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३२७ ■ शनिवार, दि. २९ मार्च २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -327 ■ Saturday, 29 March 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## विमानतळाच्या प्रांगणात तथागत गौतम बुद्धांच्या मूर्तीचे अनावरण



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येथील विमानतळाच्या प्रांगणात 'भिमता' (Buddhist Indusatrial Maufacturers And Traders Association) या संस्थेच्या वतीने साकारण्यात आलेल्या बुद्ध मुर्तीची प्रतिष्ठापना व लोकार्पण सोहळ्यासाठी श्री.सामंत आले होते. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागासवर्ग कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे, भिमता चे अध्यक्ष मिलिंद थोरात आदी यावेळी उपस्थित होते.

सविस्तर वृत्त पान ४ वर

## अबब! रेल्वे स्थानकात सापडल्या एक कोटींच्या बनावट नोटा!

**भुसावळ (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भुसावळ रेल्वे स्थानकावर ५०० रुपयांच्या सुमारे एक कोटी रुपयांच्या बनावट नोटा सापडल्याने खळबळ माजली आहे. या नोटा संशयितांच्या सामानातून मिळाल्या असून, पोलिसांनी त्या ताब्यात घेतल्या आहेत.

मलकापूरवरून भुसावळच्या दिशेने रेल्वेने येणाऱ्या दोन संशयास्पद प्रवाशांवर रेल्वे पोलिसांचा संशय बळावला. त्यांच्या सामानाची झडती घेतली असता, त्यात एक कोटी रुपयांच्या बनावट नोटांचा साठा आढळला. तपासादरम्यान एक संशयित पसार झाला, तर दुसऱ्याला रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. सामानात सापडलेल्या ५०० रुपयांच्या बंडलमध्ये वरची नोट खरी होती, परंतु खालच्या सर्व नोटांवर 'चिल्ड्रन बँक' असे लिहिलेले असल्याने त्या बनावट असल्याचे उघड झाले. या घटनेमुळे रेल्वे पोलिसांनी सतर्कता वाढवली असून, तपासाला वेग आला आहे. बनावट नोटांचा साठा आढळल्याने रेल्वे सुरक्षा बल आणि लोहमार्ग पोलिसांनी खबरदारी वाढवली आहे. अटकेतील संशयिताची कसून चौकशी सुरू असून, पळून गेलेल्या आरोपीचा शोध सुरू आहे.

## जम्मू-काश्मिरात ५ दहशतवादी ठार, ४ जवान हुतात्मा

जम्मू : जम्मू आणि काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यातील एका दुर्गम जंगली भागात झालेल्या भीषण चकमकीत ५ दहशतवादी ठार झाले असून ४ सैनिक हुतात्मा झालेत. तसेच या चकमकीत एका डीएसपीसह ५ सुरक्षा कर्मचारी जखमी झाले. यामध्ये एका पॅरा कमांडोचाही समावेश आहे.

यासंदर्भातील माहितीनुसार जैश-ए-मोहम्मदच्या पीपल्स अँटी-फासिस्ट फ्रंट या संघटने हे दहशतवादी २३ मार्च रोजी हिरानगरच्या सान्याल गावात दिसले होते. रविवारी सकाळी ८ वाजता, हिरानगरच्या राजबाग परिसरातील जुठाणाच्या अंबनाळमध्ये एका ग्रामस्थाने ५ सशस्त्र दहशतवादी पाहिले आणि पोलिसांना माहिती दिली. हे दहशतवादी बिलावरकडे जात होते. याबाबत गावकऱ्यांनी पोलिसांना सूचना दिली. त्यानंतर काही वेळातच पोलिसांचा एक ताफा घटनास्थळी पोहोचला. यावेळी दहशतवाद्यांनी स्वतःला वेढलेले पाहून गोळीबार सुरू केला.

# डमी शाळांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर सीबीएसई घालणार आळा

नवी दिल्ली : अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करणारे अनेक विद्यार्थी डमी शाळांमध्ये प्रवेश घेतात. आता या विद्यार्थ्यांना आणि डमी शाळांना आळा घालण्यासाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) पाऊल उचलले आहे. अशा डमी शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सीबीएसई बारावीच्या बोर्ड परीक्षेत बसू देणार नाही. यासंबंधीच्या नियमाची अंमलबजावणी नव्या शैक्षणिक वर्षापासून केली जाणार असल्याचे समजते. डमी शाळांवर देखील शिस्तभंगाची




कारवाई केली जाऊ शकते. या नियमामुळे परीक्षेला मुकलेले विद्यार्थी राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था (एनआयओएस) द्वारे आयोजित परीक्षा देऊ शकतील.

सीबीएसईच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, सीबीएसईच्या पथकाद्वारे संलग्नित शाळांची अचानक तपासणी केली जाते. या तपासणीवेळी विद्यार्थी गैरहजर असल्याचे आढळले. तसेच विद्यार्थांची ही गैरहजेरी सततची असेल, तर बारावीच्या बोर्ड परीक्षेला बसू दिले जाणार नाही. या संबंधीच्या उपनियम ांमध्ये पुढील शैक्षणिक वर्षापासून बदल केले जाण्याची तयारी सुरू आहे. नियमित शाळेत न गेल्यामुळे परीक्षेला बसता आले नाही. तर जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावर आणि त्याच्या पालकांवर असेल. सीबीएसईच्या नुकत्याच झालेल्या गव्हर्निंग बोर्डाच्या बैठकीतही हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. या बैठकीत हा निर्णय शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ पासून लागू करण्याची शिफारस करण्यात आली असल्याचे समजते. महाराष्ट्रात यापुढे जिल्हा परिषद व महानगरपालिकेच्या सर्वच शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम सुरू करण्याची राज्य सरकारने नुकतीच घोषणा केली आहे.



## गंगापुर तहसील कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन करुन शासनाचा जाहीर निषेध ...

**गंगापुर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची कर्जमाफी, संजय गांधी निराधार योजना व विधवा महिला व लाडक्या बहिण २१ ००रुपये महिना देण्यात यावा व व केंद्र व राज्य शासनाच्या मोठ्या प्रकल्पासाठी शासन निर्णय १९ एप्रिल २०२३ रोजी सन्माननीलय महसूल मंत्री विखे पाटील साहेब व व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्र साहेब केला होता तो अमलात आणण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व कलेक्टर, मुख्य कार्यकारी अधिकारी, व सर्व तहसीलदार, महसूल कर्मचारी यांनी सरकार आदेशाचे पालन करावे यासाठी शिवश्री प्रकाश रायभान पारखे छत्रपती संभाजी ब्रिगेड, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष यांनी शासन सेवक व प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी अंगाला पाला पाचोळा ,बांधून डफफ वाजून अर्धनग्न आंदोलन करून शासनाचा आणि जाहीर निषेध केला

## केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर! महागाई भत्त्यात २ टक्क्यांची वाढ

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आणि पेन्शनधारकांसाठी महागाई भत्ता २ टक्क्यांनी वाढवण्यास मंजुरी दिली आहे. यामुळे महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५५ टक्क्यांपर्यंत वाढणार आहे.

यापूर्वी जुलै २०२४ मध्ये महागाई भत्ता ५० टक्क्यांवरून ५३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला होता. आता झालेल्या वाढीमुळे सुमारे ६८ लाख कर्मचारी आणि ४२ लाख पेन्शनधारकांना या निर्णयाचा थेट लाभ मिळणार आहे.

महागाई भत्ता हा सरकारी कर्मचाऱ्यांना महागाईच्या वाढत्या दराचा सामना करण्यासाठी दिला जातो. यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन वाढत्या खर्चाशी सुसंगत राहते आणि त्यांच्या जीवनशैलीवर अतिरिक्त आर्थिक भार पडत नाही. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे लाखो कर्मचारी आणि पेन्शनधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**महागाई भत्ता म्हणजे काय?**

महागाई भत्ता हा एक आर्थिक लाभ आहे जो सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांना महागाईच्या प्रभावाचा सामना करण्यासाठी दिला जातो. महागाई वाढल्यास जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढतात, त्यामुळे कर्मचाऱ्यांचे राहणीमान खर्चिक होते. हा अतिरिक्त खर्च भरून काढण्यासाठी सरकार महागाई भत्ता प्रदान करते. महागाई भत्ता हा कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा एक महत्त्वाचा भाग असून, तो वाढत्या महागाईच्या वेळी आर्थिक स्थैर्य प्रदान करतो.

### महागाई भत्त्याची वैशिष्ट्ये:

महागाईच्या दरानुसार वाढ - हा भत्ता नियमितपणे (सहसा सहा महिन्यांतून एकदा, जानेवारी आणि जुलै महिन्यात) वाढवला जातो.

वेतनाच्या टक्केवारीत दिला जातो - DA हा कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनाच्या विशिष्ट टक्केवारीत दिला जातो. केंद्र आणि राज्य सरकार कर्मचारी यांना लागू - केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारे त्यांच्या कर्मचाऱ्यांना हा भत्ता देतात.

पेन्शनधारकांनाही लागू - सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना (पेन्शनधारकांना)ही महागाई भत्ता मिळतो.

शहर आणि ग्रामीण भागानुसार वेगवेगळा दर - म हागाईचा प्रभाव शहरांमध्ये आणि ग्रामीण भागात वेगळा असतो, म्हणून DA चा दर ठरवताना याचा विचार केला जातो.

# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात परिसंवादांची भूमिका मोलाची - मंत्री आदिती तटकरे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महिलांना आर्थिक साक्षरतेच्या सहाय्याने स्वावलंबी करण्यासाठी महिला व बाल विकास विभाग आणि महिला आर्थिक विकास महामंडळ सकारात्मक उपक्रम राबवित आहे. मविमने सशक्ती कॉन्क्लेव्हच्या (परिसंवाद) माध्यमातून ५५,००० हून अधिक महिलांना सक्षम बनवण्यासाठी उद्योग उभारणीत सहकार्य केल्याचा आनंद महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

मास्टरकार्डच्या पाठिंब्याने आणि लर्निंग लिंक्स फाउंडेशन (ङङऋ) द्वारे राबविण्यात आलेल्या सशक्ती कॉन्क्लेव्ह २०२४-२५ चे आयोजन नुकतेच नवी मुंबई येथे करण्यात आले होते.

यावेळी खासदार नारायण राणे, माविमच्या व्यवस्थापकीय संचालिका वर्षा लड्डा, लर्निंग लिग फाऊंडेशनच्या अध्यक्ष नुरीया अन्सारी, मार्स्टर कार्डचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक शरदचंद्रण संग्राम, पुनीत तळोजा यांच्यासह अनेक बचत गटांच्या महिला प्रातिनिधीक स्वरूपात उपस्थित होत्या.

या परिसंवादात महिलांशी संवाद साधतांना मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्यातील महिलांना शिक्षणाबरोबरच आर्थिक आत्मनिर्भर होण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून



सातत्याने प्रोत्साहित करण्यात येत आहेत. यासाठी राज्यातील जास्तीत जास्त महिलांना आर्थिक साक्षर करणे हे महत्वाचे उद्दिष्ट विभागाने डोळ्यासमोर ठेवले आहे. बचतगटांनी छोटे-मोठे उद्योग व्यवसायाबरोबरच मोठे व्यवसाय सुरू करण्यासाठी सुद्धा प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी शासनस्तरावर म हिलांना सर्वोतोपरी मदत करण्यात येत आहेत.

मोबाईलमुळे मोठी क्रांती झालेली आपल्याला पहावयास मिळते. मोबाईलसारख्या गॅझेटच्या माध्यमातून आर्थिक देवाण घेवाण करतांना महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी महिलांना अशा परिसंवादाच्या माध्यमातून आर्थिक देवाण-घेवाण करतांना कशा प्रकारे आपण खबरदारी घेतली पाहिजे याविषयी परिसंवादाच्या माध्यम ातून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

लघु उद्योगामुळे दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत

देशात महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. महिलांनी छोटे-मोठे उद्योग व्यवसाय सुरू करून आर्थिक सक्षम होण्याचा निर्धार. यामुळे कुंटुबाला आर्थिक हातभार तर लागेलच परंतू निर्णय घेण्याचे स्वातंत्र देखील मिळणार आहे. महिलांनी सूरू केलेल्या उद्योग व्यसायामुळे देशाचे दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. यासाठी केंद्र आणि राज्य शासन सदैव महिलांच्या पाठीशी उभे असल्याचे खासदार नारायण राणे यांनी सांगितले.

व्यवस्थापकीय संचालक वर्षा लड्डा म्हणाल्या की, माविम आणि लर्निंग लिंक्स फाउंडेशन (ङङऋ) सारख्या स्वयंसेवी संस्थांम धील सहकार्यामुळे स्वयं-मदत गट (SHG) सक्षम होण्यासाठी मदत होत आहे. २००० महिलांना एल एल एफ ने प्रशिक्षण देऊन, २०० महिलांना एलएलएफ-मास्टरकार्ड भागीदारी अंतर्गत अनुदान प्रदान केले. यामुळे यशस्वीरित्या त्यांचे व्यवसाय सुरू आहेत. हे खरोखरच प्रशंसनीय आहे.

## नद्या स्वच्छतेचे तीन तेरा

भारत हा नद्यांचा देश म्हणून ओळखला जातो. गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, नर्मदा, तापी यांसारख्या मोठ्या नद्यांपासून ते स्थानिक नद्यांपर्यंत सर्व नद्या लाखो लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. मात्र, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि अपुऱ्या स्वच्छता सुविधा यामुळे नद्यांचे प्रदूषण वाढत आहे. विशेषतः महाराष्ट्रातील गोदावरी, भीमा, पंचगंगा आणि मुळा-मुठा नद्यांमध्ये प्रदूषणाची पातळी चिंताजनक बनली आहे. भारतातील नद्यांमधील प्रदूषणाचे प्रमाण मोजण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ वेळोवेळी अभ्यास आणि अहवाल प्रकाशित करते. या अहवालांनुसार, देशभरातील ३५१ नद्या अत्यंत प्रदूषित असून ४५ नद्या महाराष्ट्रातील आहेत, ज्या 'गंभीर प्रदूषित' गटात मोडतात. नीती आयोगाच्या अहवालानुसार-२०३० पर्यंत भारतात पिण्यायोग्य पाण्याचा तुटवडा निर्माण होऊ शकतो, याचे एक कारण म्हणजे जलप्रदूषण. नीती आयोग आणि प्रदूषण मंडळाच्या संयुक्तिक अहवालानुसार, गंगा आणि यमुना यांसारख्या नद्यांमध्ये जैविक ऑक्सिजनची पातळी अत्यंत कमी आहे आणि यामुळे जलचरांचे अस्तित्व धोक्यात आहे. नदीप्रदूषणाची पाच प्रमुख कारणे अभ्यासांमधून दिसून आली आहेत. एक म्हणजे औद्योगिक कचरा. देशातील औद्योगिक क्षेत्रांतून रासायनिक सांडपाणी नद्यांमध्ये मिसळत असून त्यामुळे नद्यांचे पाणी विषारी बनत आहे. याखेरीज शहरे आणि गावांतून नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मैला सोडला जातो. अनेक नद्यांमध्ये प्लास्टिकचा ढीगही वाढत चालला असून यामुळे नद्यांमधील परिसंस्थेची हानी होत आहे. शेतीमधील कीटकनाशके आणि रासायनिक खतांमुळेही जलप्रदूषण वाढत आहे. याखेरीज मूर्ती विसर्जन, पूजेचे साहित्य टाकणे यामुळेही नदीप्रदूषण वाढत आहे.

अलीकडेच जलशक्ती मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सांडपाणी व्यवस्थेतील त्रुटींमुळे नद्यांचे प्रदूषण दूर करण्यात अपेक्षित यश मिळत नाही. वस्तुतः या माहितीत नवीन काही नाही. किंबहुना, हे वास्तव वेळोवेळी समोर येत आहे. नद्यांच्या काठावर वसलेल्या शहरांच्या सांडपाणी व्यवस्था सुधारण्याचे काम पूर्ण होत नाही ही निराशाजनक आणि चिंताजनक बाब आहे. नदीकाठावर वसलेल्या शहरांतील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने काम करत नाहीत, हे कुणापासून लपून राहिलेले नाही. काही ठिकाणी त्यांची क्षमता इतकी कमी आहे की त्यांना गटारातील घाण पाण्यापैकी निम्मे पाणीही प्रक्रिया करता येत नाही. दुसरी समस्या अशी आहे की ही संयंत्रे खराब झालेली आहेत.

वास्तविक पाहता, आपापल्या राज्यांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पुरेशा संख्येत आहेत की नाही आणि असणारे प्रकल्प पूर्ण क्षमतेने काम करताहेत की नाही हे पाहण्याची जबाबदारी राज्य सरकार आणि त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. परंतु त्यांचे काम नीट होत नाहीये हे लक्षात आल्यानंतर केंद्र सरकारने राज्यांवर दबाव आणला पाहिजे. यात विलंब होता कामा नये, कारण अनेक शहरांतील घाण नाले अद्याप सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना जोडलेलेही नाहीयेत. त्यामुळे घाण नाल्यातील कचरा थेट नद्यांमध्ये जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारने ज्या नद्या प्रदूषणमुक्त करण्याचे वचन दिले होते, त्या नद्यांचाही प्रदूषित नद्यांच्या यादीत समावेश आहे, ही बाब अधिक गंभीर म्हणावी लागेल. सर्व नाले सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना जोडण्याबाबत आणि त्यातून कोणत्याही परिस्थितीत घाण पाणी नद्यांमध्ये जाणार नाही, यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित का केली जात नाही? याबाबत कोणताही ठराव का केला जात नाही? हा प्रश्न अनाकलनीय आहे.

# हौतात्म्यामुळे अजरामर पराक्रमी पुरूष

**(२९ मार्च: छत्रपती संभाजी महाराज पुण्यस्मरण सप्ताह.)**

**स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची आज पुण्यतिथी आहे. अगदी लहान असल्यापासून त्यांच्यावर अनेक संकटे आली. त्या संकटांवर पाय रोऊन उभे न राहता संभाजी महाराजांनी समर्थपणे झेपही घेतली. अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांबद्दल काही सत्य गोष्टी श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींच्या संकलित लेखातून जाणून घेऊया...संपादक.**

स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची आज पुण्यतिथी आहे. छत्रपती संभाजी महाराजांची संपूर्ण कारकीर्द तेजोमय होती. अगदी लहान असल्यापासून त्यांच्यावर अनेक संकटे आली. त्या संकटांवर पाय रोऊन उभे न राहता संभाजी महाराजांनी समर्थपणे झेपही घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा सक्षमपणे आपल्या हातात घेऊन संपूर्ण हिंदुस्थानाला तोंडात बोटे घालायला लावणारा प्रचंड पराक्रम संभाजी महारांजी केला. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर किंवा त्यानंतरही अनेक मोहिमा संभाजी राजेंनी यशस्वीपणे राबवल्या. कोणत्याही मोहिमेत त्यांना कधीच अपयश आले नाही. छत्रपती संभाजी महाराजांना टक्कर देईल, असा योद्धा तत्कालीन हिंदुस्थानात नव्हता. संभाजी राजे हे असामान्य व्यक्तिमत्त्व होते. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असमान्य शौर्य, प्रयत्नांची पराकाष्ठा, अनेक भाषांवर प्रभुत्व, संस्कृत पंडित, धर्माभिमानी, व्यासंगी, आदर्श महावीर, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण अशा अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांबद्दल काही गोष्टी आपल्याला माहित असायलाच हव्यात.

संभाजी राजेंचे बालपण: संभाजी राजांचा जन्म दि.१४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांना पुत्ररत्न झाले. शिवाजी महाराजांचे संभाजी राजेंवर अपार प्रेम होते. नशीबाचे दशावतार संभाजी महाराजांनी अगदी लहानपणापासूनच भोगले. संभाजी राजे दोन वर्षांचे असताना सईबाईचे अकाली निधन झाले. त्यानंतर त्यांचा सांभाळ राजमाता जिजाऊंनी केला. केशवभट आणि उमाजी पंडित यांनी संभाजी राजेंना उत्तम शिक्षण दिले. सुरुवातीच्या काळात त्यांची सावत्र आई सोयराबाई यांनीही त्यांच्यावर खूप माया केली. अनेक ऐतिहासिक नोंदींप्रमाणे संभाजीराजे अत्यंत देखणे आणि शूर होते. लहान असल्यापासूनच संभाजी महाराजांनी राजकारणातील डावपेच, गनिमी कावा अगदी भराभर आत्मसात केला.

नवव्या वर्षी आग्रा मोहीम: छत्रपती शिवाजी महाराज आग्रा मोहिमेवर गेले असताना त्यांनी संभाजी राजेंनाही सोबत घेतले होते. त्यावेळी संभाजी राजे अवघ्या नऊ वर्षांचे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक गोष्टी त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. शिवाजी महाराज आग्र्याहून सुटल्यानंतर त्यांनी संभाजी महाराजांना मथुरेत ठेवले होते. संभाजी राजेंवर सुरक्षित स्वराज्यात आणण्यासाठी संभाजी राजेंचे निधन झाल्याची अफवा महाराजांनी पसरवून दिली. त्यानंतर २० नोव्हेंबर १६६६ रोजी अगदी सुखरूपपणे ते पुन्हा राजगडास पोहोचले. आग्र्याहून रायगडावर पुन्हा परत येताना संभाजी राजेंनी केलेल्या बुद्धिचातुर्याच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत.

चौदाव्या वर्षी बुधभूषण ग्रंथ: छत्रपती संभाजी महाराजांनी दिलेल्या काही दानपत्रावरून त्यांच्या संस्कृत ज्ञानाविषयी माहिती मिळते. संभाजी राजेंनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी बुधभूषण हा ग्रंथ लिहिला. हीच गोष्ट स्वराज्यविरोधक नीच कपटी ब्राह्मणवर्गास सलत होती. बहुजनसमाजातील व्यक्तीने लेखनवाचन करू नये, केल्यास देहदंडाची शिक्षा द्यावी, असा त्यांचा दंडकारण्य होता. तरीही संभाजींनी तीन भागांतील बुधभूषण या ग्रंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विविद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. तसेच राजा आणि त्याचे गुण, राजाचे मदतनीस, राजाचे सल्लगार, राजाची कर्तव्ये, राजसभा, मुख्य प्रधान राजपुत्र, त्यांचे शिक्षण, त्यांची कर्तव्ये, कोश, दुर्ग, सैन्य, हेर, नोकर, वगैरेंची माहिती दिली आहे. याशिवाय गागाभट्टांकडून नीतिपर 'समयनय' हा ग्रंथ संभाजी राजेंनी लिहून घेतला. 'धर्म कल्पलता' हा धर्मशास्त्रावरील ग्रंथ केशव पंडिताने संभाजीराजांसाठी लिहिला. युद्धकलेतील नैपुण्याबद्दल ॲबे कॅरे या परकीय लेखकाने संभाजी महाराजांची प्रशंसा केली आहे. यावरून संभाजी महाराजांच्या अफाट बुद्धी, ज्ञान, अनेक भाषांवरील प्रभुत्व, धम र्भिमान याचा अंदाज लावता येऊ शकतो.



**- संकलन व शब्दांकन -**
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

कुशल संघटक: छत्रपती संभाजी महाराज हे राज्यकारभारातही अत्यंत निपूण होते. ते कुशल संघटक होते.

छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे पुढे छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांनीही अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली होती. यामध्ये पंतप्रधान म्हणून निळोपंत पिंगळे, चिटणीस म्हणून बाळाजी आवजी, सेनापती म्हणून हंबीरराव मोहिते, न्यायाधीश म्हणून प्रल्हाद निराजी, पंत सुमंत म्हणून जनार्दन पंत, पंडितराव दानाध्यक्ष म्हणून मोरेश्वर पंडितराव, पंत सचिव म्हणून आबाजी सोनदेव, पंत अम ात्य म्हणून दत्ताजी पंत, पंत अमात्य म्हणून अण्णाजी दत्तो यांची नियुक्ती करण्यात आली होती.

'श्री शंभो: शिवजातस्य मुद्राद्यौरिव राजते।

यदं कसेविनी लेखा वतर्ते कस्यनोपरि ।

अशी छत्रपती झाल्यावर संभाजी म हाराजांची मुद्रा होती.

अजिंक्य संभाजी राजे: छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या पराक्रमाच्याजोरावर अल्प काळात मराठा साम्राज्याच्या विस्तार आणि बचाव केला. मराठा साम्राज्याच्या १५ पट असणाऱ्या मुघल साम्राज्याशी संभाजी महाराजांनी एकहाती लढा दिला. संभाजी महाराजांनी गनिमी कावा पुरेपूर वापरत औरंगजेबाला पुरते जेरीस आणले होते. संभाजी राजेंनी आपल्या कार्यकाळात एकूण १२० युद्धे लढली. महत्वाचे म्हणजे संभाजी महाराजांना १२० पैकी एकही लढाईत अपयश आले नाही. असा पराक्रम करणारे छत्रपती संभाजी महाराज हे एकमेव योद्धा होते. संभाजी राजांना टक्कर देणारा योद्धा तत्कालीन हिंदुस्थानात नव्हता.

बुऱ्हाणपूर आणि रामशेज: छत्रपती शिवरायांनंतर शंभूराजे छत्रपती झाले. संभाजी महाराजांनी सरसेनापती म्हणून हंबीरराव मोहिते यांची नियुक्ती केली. सरनौबत हंबीरराव मोहिते यांनी अचानक बुऱ्हाणपूरवर हल्ला केला. मोठ्या फौजफाट्यासह मराठी सैन्य ७० मैलाची मजल मारून एकाएकी बुऱ्हाणपुरावर चालून गेले. तीन दिवसापर्यंत मराठे लुट करत होते. जडजवाहीर, सोने-नाणे, रत्ने आणि मौल्यवान सामान घेतले. इतर जिन्नसाकडे त्यांनी लक्षही दिले नाही.

भांडीकुंडी, काचेचे सामान, धान्य, मसाले, वापरलेली वस्त्रे आदी सर्व लूट वाहून नेणे शक्य नसल्यामुळे तेथेच टाकून मराठ्यांचे सैन्य निघून गेले.

संभाजी महाराजांच्या दराऱ्यामुळे पुढील काही महिने त्या वस्तूला हात लावायची कुणाची हिंमत झाली नाही, अशी आख्यायिका आहे. शहाबुद्दीन फिरोजजंगने रामशेज किल्ल्यावर चाल करून गेला. हा किल्ला सहज हस्तगत करता येईल, अशी मोघलांचा समज होता. मात्र, संभाजी महाराजांनी या किल्ल्यावर रसद पोहोचवण्यासाठी खास तुकडी तैनात केली. मराठ्यांनी कडवी झुंज देत हा किल्ला ५ वर्षे झुंजवत ठेवला होता.

उदार धार्मिक लोकनीति: छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण संभाजी राजेंनी पुढे चालू ठेवले. अनेक देवस्थाने, मठ, सत्पुरूष यांना वार्षिक नेमणुका पूर्ववत करून दिल्या. संभाजी महाराजांनी संत तुकारामांचा मुलगा महादोबा यास वर्षासन दिले. तसेच मौनी गोसावी, गणीराम, वासुदेव गोसावी, कऱ्हाडचे वेदशास्त्री नरसीभट शेषभट मुंज्येम णी, कांदळगावचे अनंत भट, महादेव भट, महाबळेश्वरचे वेदमूर्ती रामभट, कऱ्हाडचेच शिवभट नीलकंठभट अग्निहोत्री, पावसचे हरिभट पटवर्धन, रामचंद्र केशवभट पंडित, निंब येथील सदानंद मठाचे अनंतगिरी गोसावी यांना सढळ हस्ते मदत केली. त्यांच्या व्यवस्था लावल्या. संभाजीराजांनी चिंचवड, मोरगाव, सज्जनगड, चाफळ, शिंगणवाडी, महाबळेश्वर इ. देवस्थानांचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने चालावे, यासाठी पूर्वीची वृत्ती, इनामे व सनदा पूर्ववत केल्या. एकूण धार्मिक कारभाराकडे ते जातीने लक्ष घालत असत, हे तत्कालीन पत्रव्यवहारांतून दिसते.

हौतात्म्यामुळे अजरामर झालेले पराक्रमी पुरूष: सन १६८९ च्या सुरवातीला छत्रपती संभाजी राजेंचा मेहुणा गणोजी शिर्के आणि औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान यांनी संगम ेश्वरवर हल्ला केला. मराठ्यांत आणि शत्रूसैन्यात चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी होते. प्रयत्नांची शर्थ करूनही मराठे शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाहीत. परिणामी संभाजी महाराजांना जिवंत पकडण्यात मोघलांना यश आले. संभाजीराजे आणि कवी कलश यांना औरंगजेबापुढे बहादुरगड येथे नेले. बालविद्येचे ठेकेदार कपटी ब्राह्मणवर्गाने औरंग्याशी हातमिळवणी केली व संभाजींना देह यातना देत मारावे, असा निर्वाणीचा सल्ला त्यास दिला. त्याप्रमाणे संभाजीराजांनी धर्मांतर केल्यास जीवदान देण्याची अट औरंगजेबाने घातली होती. मात्र, संभाजी राजेंनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. औरंगजेबाचे अनन्वित अत्याचार छळ जसे कानानाकात तप्त शिसे ओतले, जिभ छाटली, अवयव तोडले व शेवटी शिरच्छेद केला. हे असह्य होऊन सुमारे ४० दिवसांनी फाल्गुन अमावास्या म्हणजेच यंदाच्या वर्षीप्रमाणे दि.२९ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांची प्राणज्योत अखेर मालवली.

दुर्सयाच दिवशी म्हणजेच गुडी पाडव्याच्या दिवशी द्वेषी ब्राह्मणांसहीत मोघलांनी राजांचे म ुंडके बांबूत खोचून गावभर उत्साहात मिरवणूक काढली. तेव्हापासून ही परंपरा बांबूवर गढवे उपडे ठेवून गुढी उभारण्यास सुरूवात झाली. असह्य यातना सहन करूनही संभाजीराजांनी स्वराज्यनिष्ठा आणि धर्मनिष्ठा सोडली नाही. म्हणून त्यांना अखंड भारतवर्षाने धर्मवीर हे पदवी बहाल केली. बहुजनवर्ग ही परंपरा आजही उत्साहात चालवीत आहे. शुभचिन्ह व शुभमुहूर्त म्हणून माझ्या राजाच्या हालहालकडे डोळेझाक करत आहे.

# सोन्याची खरेदी हॉलमार्क तपासूनच करायची

गुढीपाडवा आता काही दिवसांवर आला आहे. त्यानंतर लग्नसराईही सुरू होईल. या दोन्ही प्रसंगी सोने खरेदीचे प्रमाण खूपच वाढते. भारतीय कुटुंबात सोन्याची मागणी आणि सोने खरेदीचा प्रभाव एवढा आहे की, आर्थिक परिस्थिती कशीही असली तरी, मंगल कार्याला आणि सणासुदीला सोने खरेदी होतेच. याचे कारण थोडे धार्मिकही आहे कारण सोन्याकडे लक्ष्मी म्हणूनही पाहिले जाते. सणाला ती आपल्या घरी यावी हीच सर्वांची इच्छा असते. याशिवाय काही जण भविष्यासाठी तरतूद किंवा गुंतवणूक म्हणूनही सोन्याची नाणी खरेदी करतात, अगदी सोन्याचे भाव सध्या गगनाला भिडले आहेत तरीही.

आपल्याला माहितीच आहे की, सोन्याचे दागिने खरेदी करताना आता त्यावर हॉलमार्क असणे कायद्याने बंधनकारक आहे. त्यामुळे आपण हॉलमार्क असलेलेच दागिने विकत घेतो. सोन्याच्या दागिन्यावरचा हॉलमार्क इखड (ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स - भारतीय मानक प्राधिकरण) ही ग्राहक संरक्षण मंत्रालयाची संस्था प्रमाणित करते. हा हॉलमार्क म्हणजे त्यात तीन गोष्टींचा समावेश असतो. इखड चे चिन्ह, सोने किती कॅरेटचे आहे ती संख्या आणि कणखऊ (हॉलमार्क युनिक आयडेंटिफिकेशन डिजिट). HUID म्हणजे कोणतीही संख्या आणि अक्षर यांचे मिश्रण असलेला कोड नंबर आणि तो सोन्याच्या प्रत्येक दागिन्यासाठी वेगळा असतो. अँड्रॉइड फोनवर, प्ले स्टोअरमध्ये जाऊन BIS> Care A{{ ॲप डाउनलोड केल्यावर त्यात verify H$UID नंबर टाकला की, दागिन्याची सर्व माहिती आपल्याला दिसते. उदा. ज्वेलर्स रजिस्ट्रेशन नंबर, हॉलमार्किंग केंद्राचे नाव / पत्ता, दागिन्याचा प्रकार, हॉलमार्किंगची तारीख, दागिन्याची शुद्धता इत्यादी. नवीन नियमानुसार हॉलमार्किंग केलेल्या २ ग्रामपेक्षा जास्त वजनाच्या दागिन्यावर व कलाकृतीवर हॉलमार्क आवश्यक आहे.

कोणताही दागिना मग तो दागिना एखादी अंगठी असो किंवा मोठा चपलाहार, हॉलमार्किंग करण्यासाठी अगदी मामुली खर्च येतो. प्रति दागिन्यांसाठी फक्त ४५ रुपये+जी.एस.टी. शुल्क आहे. तसेच चांदीच्या प्रति दागिन्यांसाठी ३५ रुपये+जी.एस.टी. शुल्क आहे. दागिन्याच्या वजनाप्रमाणे याची किंमत वाढू शकते. वेगळे होणाऱ्या दागिन्यातील प्रत्येक भागावर स्वतंत्र हॉलमार्क असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ कानातील टॉप आणि त्याची फिरकी किंवा चेन आणि पेंडन्ट, दोन्हींवर वेगळा हॉलमार्क असणे आवश्यक आहे. या हॉलमार्किंगमुळे ग्राहकाचा एक मोठा फायदा होतो तो म्हणजे आपलं सोनं किती कॅरेटचे आहे ते कळते आणि ते मोडून त्याचा नवीन दागिना करताना सोनार आपल्याला फसवून त्याच्यातून घट कापून घेऊ शकत नाही आणि जेवढ्या कॅरेटचा तो दागिना आहे तेवढा मोबदला आपल्याला पूर्णपणे मिळतो.



अशा प्रकारे आपली सोन्याची खरेदी ही पैशाचा पूर्ण मोबदला देणारी होते. म्हणूनच आपण हा हॉलमार्क सोनाराकडून दागिने घेताना नीट पारखून तपासून घेतला पाहिजे. पूर्वीचा आपला सोन्याचा दागिना ज्याच्यावर हॉलमार्किंग नाही, तो सुद्धा आपल्या एखाद्या जवळच्या इखड सेंटरवर जाऊन त्याचं प्रमाणीकरण आपण करून घेऊ शकतो. त्या दागिन्याच्या फोटोसकट सगळ्या माहितीचे सर्टिफिकेट आपल्याला ही संस्था देते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर हॉलमार्क हे आपल्या दागिन्यांचं आधार कार्ड आहे असं आपण त्याला म्हणू शकतो. आधार कार्डप्रमाणेच त्यात त्या दागिन्याची सर्व माहिती असते.

राजपत्रातील अधिसूचनेनुसार ३१ मार्च २०२३ नंतर कोणताही सोनार सोन्याचे दागिने किंवा कलाकृती अधिकृत कणखऊ शिवाय आणि हॉलमार्कशिवाय विकू शकत नाही. बेकायदेशीर किंवा बनावट हॉलमार्क असलेल्या सोन्याच्या दागिन्यांची विक्री झाली तर तो गुन्हा ठरतो. दागिन्यावरचा हॉलमार्क आपण सोनाराकडून भिंग घेऊन नीट पारखून तपासून घेतला पाहिजे. कारण अलीकडेच इखड च्या मुंबई येथील अधिकाऱ्यांनी बदलापूर येथे एका सोनाराच्या दुकानावर धाड टाकून २५१.३९० ग्रॅमचे सोने जप्त केले, ज्यावरील हॉलमार्क बनावट होता आणि त्या दागिन्यांचा कणखऊ कोडही नव्हता. या सोन्याची किंमत सुमारे २१ लाख होती. भारतीय मानांकन संस्थेच्या २०१६ च्या कायद्यानुसार या सोनाराविरुद्ध फौजदारी तक्रार करण्यात आली. गुन्ह्याची शिक्षा म्हणून वरील सोनाराला कारावास किंवा एक लाख रुपयांपेक्षा जास्त दंड किंवा विक्री करण्यात येणाऱ्या सोन्याच्या किमतीच्या पाच पट दंड अशी वाढवून यापैकी कोणतीही शिक्षा न्यायालय देऊ शकते. वरील उदाहरणावरून आपल्या लक्षात येईल सोन्याचा दागिना किंवा कलाकृती घेताना आपली फसवणूक होऊ न देणे किती गरजेचे आहे ते. त्यासाठी आपण सोनाराकडून हॉलमार्क असलेला दागिना घेतला, या विश्वासात न राहता प्रत्यक्ष भिंग घेऊन (जे सोनाराकडे असणे कायद्याने बंधनकारक असते), त्याने प्रत्येक दागिन्याचा हॉलमार्क "BIS> Care A{{ A°n' वर टाकून तपासायला हवा. बदलापूर येथे जप्त केलेल्या सोन्यावरून आपल्याला हे समजले असेल की, दागिन्यांवर कोरलेला हॉलमार्कसुद्धा बनावट असू शकतो. तसेच सोन्याचे वजन करताना त्याचा डिजिटल काटा (जो काचेच्या छोट्या चौकटीत असतो) तो वजन करताना बंद असायला हवा. त्यावर बाहेरील वाऱ्याचा दाब पडता कामा नये. सोने हा अतिशय मौल्यवान धातू असल्यामुळे ग्राहकांचे एक-दोन ग्रॅम सोन्याचा जरी फरक पडला तरी कित्येक हजारांचा फटका त्याला बसतो. त्यामुळे सोन्याची खरेदी करताना आपली फसवणूक होऊ नये म्हणून ती सजगतेने आणि आपल्या नेहमीच्या विश्वासू सोनारांकडूनच करायला हवी. सोनाराकडे घडणावळ कमी आहे किंवा अशा प्रलोभनांना बळी न पडता सोन्याची खरेदी सावधगिरीने करू या. गुढीपाडव्याच्या सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा !

**-सुमिता चितळे : मुंबई ग्राहक पंचायत**

# एमएमआरडीएचा ४० हजार १८७ कोटींचा अर्थसंकल्प एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## एमएमआरडीएच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे मुंबईचे महत्व आणखी वाढणार - उपमुख्यमंत्री

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येणाऱ्या काळात मुंबईचा कायापालट करणाऱ्या अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे या महानगराचे महत्व आणखी वाढणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या बैठकीत म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा २०२५-२६ साठीचा रू. ४०,१८७.४१ कोटींचा अर्थसंकल्प महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी एमएमआरडीए सभागृहातील बैठकीत सादर केला. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्री. मुखर्जी यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.



मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांना अधिकाधिक आणि जागतिक दर्जाच्या सेवा सुविधा उभारण्यासाठी सदर अर्थसंकल्पात रु. ३५,१५१.१४ कोटी म्हणजेच एकूण खर्चाच्या सुमारे ८७ टक्के निधी पायाभूत प्रकल्पांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. ही तरतूद मेट्रो मार्गांचे विस्तारीकरण, नवीन बोगदे मार्ग, सागरी मार्ग, जलस्रोत विकास आणि नागरी पायाभूत सुविधा यांसारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पांमध्ये करण्यात आली आहे.

या अर्थसंकल्पीय अंदाजात २०२५-२६ साठी रू. ३६,९३८.६९ कोटी महसूल अपेक्षित आहे.

**एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल - मुख्यमंत्री**

या अर्थसंकल्पावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेश हा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा कणा आहे. मुंबई महानगर प्रदेशामधील सुरू असलेली पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे राज्याच्या प्रगतीच्या वाटचालीला वेग देत आहेत. दावोस येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम दरम्यान महाराष्ट्राने एकूण रू १५.७० लाख कोटी गुंतवणुकीच्या ५४ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली असून, त्यापैकी एमएमआरडीएने एकट्यानेच ११ सामंजस्य करार करत रू ३.५० लाख कोटींच्या गुंतवणुकीचे करार केले आहेत. हे करार एमएमआरडीएच्या नेतृत्वात साकारले गेले असून, महाराष्ट्रातील गुंतवणुकीसाठी असलेला जागतिक स्तरावरील विश्वास दर्शवतात. ही अर्थसंकल्पीय तरतूद एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण व गतिमान विकास ही आमची सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. नव्या मेट्रो मार्गांपासून ते जलस्रोत प्रकल्पांपर्यंत सर्व क्षेत्रात समावेशक प्रगती साधणारा हा अर्थसंकल्प आहे. एमएमआरडीएच्या योजनांमुळे मुंबई जागतिक आर्थिक केंद्र म्हणून पुढे येईल, एमएमआरडीएने सादर केलेला २०२५-२६चा अर्थसंकल्प हा दूरदृष्टी असलेला, व्यापक आणि मुंबई महानगर प्रदेशाचा बहुआयामी विकास साधणारा दस्तऐवज आहे. २०२५-२६ या वर्षासाठी सादर केलेला अर्थसंकल्प हा भविष्यमुखी आहे. ३५,००० कोटींपेक्षा अधिक निधी थेट प्रकल्पांसाठी आहे. मेट्रो मार्ग विस्तार, भुयारी मार्ग, जलस्रोत विकास, नवे व्यापार केंद्र - हे सर्व मुंबईमहानगर प्रदेशाच्या भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. एमएमआरडीएचा २०२५-२६ अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा दस्तऐवज नसून मुंबई महानगर प्रदेशाच्या भविष्याचा आराखडा आहे,ङ्ख असे प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, म्हणाले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व एमएमआरडीएच्या नेतृत्वाखाली हा अर्थसंकल्प मुंबईसह महानगर प्रदेशाला जागतिक शहर होण्याच्या प्रवासात मैलाचा दगड ठरणार आहे. या अर्थसंकल्पातून मुंबई महानगर प्रदेशात एकात्मिक, समतोल व वेगवान विकासास चालना मिळणार असून, प्रवासाचा वेळ व अंतर कमी होऊन वाहतूक कोंडीस दिलासा मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# महाबोधी बुद्ध गयाचा मुक्ती आंदोलनात काँग्रेसने चुप्पी का साधली- बागडे

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संविधानाच्या सर्वात जास्त गप्पा मारणारे आज महाबोधी बौद्ध गया मुक्ती आंदोलनात गप्प का या देशातील बौद्ध मोठ्या संख्येने संविधानाच्या गाजवा करणाऱ्या काँग्रेसच्या सोबत खंबीरपणे उभे राहिले आज बौद्धांच्या अस्मितेचा प्रश्नावर काँग्रेस पक्षाची चुप्पी का असा सवाल आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केले.



संविधानाच्या अनुच्छेद २५ अनुसार प्रत्येक धर्माला आपल्या धर्माचे स्वातंत्र्य दिले मग देशातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील बोद्धाचे पवित्र स्थान असलेल्या महाबोधी बुद्ध गयाचा मुक्तीच्या लढात स्वताला लोकशाहीचा पुळका समजणाऱ्यांनी या लढात स्वताला झोकून दिले पाहिजे यासाठी महाराष्ट्रात विराजमान असलेल्या सरकारने सुद्धा दोन्ही सभागृहात ठराव पारित करून केन्द्र सरकार सादर करून राज्यातील कोट्यवधी बौद्धांच्या सन्मान करावा असे हि बागडे म्हणाले.

महाबोधी विहाराच्या मुक्तीसाठी जागतिक पातळीवर आंदोलन कसे उभारता येईल या दृष्टीने युनायटेड नेशंनचे लक्ष वेधण्यासाठी राज्यासह देशातील बौद्ध विचारवंत, धम्म गुरू, बौद्ध उपासक आणि उपासीका यांची मोठ कशी बांधता येईल या करिता उपाययोजना केल्या शिवाय पर्याय नाही यासाठी लवकरच राज्यव्यापी जनसंपर्क दौरा नारायण बागडे हे करणार आहे असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रसारण प्रमुख शाम भाई बागुल यांनी प्रसिद्धी माध्यमांना कळिवले आहे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सकल चर्मकार समाजाच्या वतीने बैठकीचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

१३४ वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सकल चर्मकार समाजाच्या वतीने साजरी करण्याचे दृष्टीने छत्रपती संभाजीनगर शहरातील चर्मकार समाज बांधव ज्यात हिंदी भाषिक मराठी भाषेत अहिरवार, चर्मकार , ढोर, जाटव असे बहुभाषिक चर्मकार समाजाची बैठक रविवार दिनांक ३० मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता श्री संत रविदास महाराज मंदिर एन-९, टीव्ही. सेंटर संजय गांधी मार्केट छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी ठेवण्यात आली आहे. सदर बैठकीत डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या संघर्षाची जाणीव तसेच त्यांनी समाजावर केलेले उपकाराची जाणीव चर्मकार समाजात व्हावी या उद्देशाने बाबासाहेबांच्या जयंतीचा सोहळा मोठ्या उत्साहात रस्त्यावर मिरवणूक काढून साजरा करण्याचे प्रयोजनार्थ बैठकीचे आयोजन केले आहे. तरी डॉ. बाबासाहेब सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ च्या बैठकीस सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आंबेडकरवादी चर्मकार युवा एकता मंच व केंद्रीय उत्सव समिती अध्यक्ष बालाजी सोनटक्के माजी सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.



# जयकुमार गोरे प्रकरणात शरद पवार गटाचा सहभाग

## सुळे आणि रोहित पवार आरोपीच्या संपर्कात - फडणवीसांचा आरोप

मुंबई : मंत्री जयकुमार गोरे यांना अडकवण्याच्या कटात शरद पवार गटाचा मोठा सहभाग असल्याचा थेट आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केला. या प्रकरणात खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार हे आरोपी तुषार खरातच्या संपर्कात असल्याचा दावा त्यांनी केला. फडणवीस म्हणाले, ङ्गजयकुमार गोरे यांच्याविरोधातील केस २०१६ मध्ये दाखल झाली आणि २०१९ मध्ये संपली. तेव्हा ते भाजपमध्ये नव्हते. तरीही, त्यांनी ब्लॅकमेलिंगचा बळी न बनता लाचेची मागणी झाल्यानंतर थेट पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर सापळा रचून आरोपींना रंगेहाथ पकडण्यात आले.

मी त्यांच्या हिंमतीची दाद देतो, एखादा व्यक्ती अशा परिस्थितीत दोषी आहोत की नाही आहोत, घरच्यांना समाजात अपमान नको म्हणून अशा गोष्टी मिटवण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांनी लाचेची मागणी झाल्यानंतर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार केली. तक्रारीनंतर ट्रॅप लावला, सगळं संभाषण टेप झालं, सगळी मागणी टेप झाली. मागणी टेप झाल्यानंतर पोलीस विभागाची खात्री पटली त्यानंतर सापळा रचला. पैसे देताना आरोपीला पकडलं. हा ब्लॅकमेलिंगचाच प्रकार होता. या प्रकरणात एकूण चार तक्रारी दाखल झाल्या असून, आरोपींनी खोट्या प्रचाराद्वारे एका महिलेचा सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या घराण्याशी संबंध असल्याचा दावा केला होता. या कटात संबंधित महिलेसह तुषार खरात आणि अनिल सुभेदार यांचा सहभाग असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणातील लोकांना अटक झाली आहे. एक ती महिला आहे. दुसरा तुषार खरात आणि तिसरा अनिल सुभेदार आहे. या सगळ्यांनी मिळून हा कट रचला. याबाबत सगळे पुरावे सापडले आहेत. त्यांचे व्हाट्सअप वरचे संभाषण सापडले आहे. फडणवीस यांनी दावा केला की, आरोपींमध्ये झालेली फोनवरची १५० हून अधिक संभाषणे आणि व्हॉट्सॲप चॅट्स यावरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्याशी त्यांचा थेट संबंध असल्याचे दिसून येते.

प्रभाकरराव देशमुख हे तीनही आरोपींशी थेट संपर्कात होते, तर सुप्रिया सुळे आणि रोहित पवार यांचे कॉल्स तुषार खरात याच्यासोबत झाले आहेत. जयकुमार गोरे यांच्या विरोधातील व्हिडिओ आरोपींनी तयार करून सुळे आणि पवार यांना पाठवले, असे पुराव्यांसह सांगत फडणवीस यांनी या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी केली.

मी हे पुराव्यानिशी सांगत आहे. प्रभाकरराव देशमुख हे थेट तिन्ही आरोपींशी बोललेले आहेत. मला वाईट वाटतं ते म्हणजे सुप्रिया सुळे आणि रोहित पवार यांचे कॉल्स तुषार खरात सोबत आहेत. गोरे यांच्या विरुद्ध जे व्हिडिओ केले आहेत ते व्हिडिओ केल्यानंतर त्यांनी सुळे आणि पवार यांना पाठवले आहेत. आता याची चौकशी होणार आहे. हे चाललं काय आहे. आपण राजकीय विरोधक आहोत, शत्रू नव्हे. मात्र, राजकीय स्पर्धेतून कोणाचे संपूर्ण आयुष्य उध्वस्त करण्याचा हा प्रकार अयोग्य आहे. अशाप्रकारे कोणाला जीवनातून उठवणे चुकीचे आहे, असेही फडणवीस यांनी ठामपणे स्पष्ट केले.

# सिकंदर सिनेमाच्या प्रमोशनसाठी सलमान खानने वापरले राम मंदिराचे चित्र असलेले घड्याळ, मुसलमान धर्मगुरु भडकले

मुंबई : बॉलिवूड अभिनेता सलमान खान याचा सिकंदर नावाचा हिंदी चित्रपट लवकरच प्रदर्शित होत आहे. हा २०० कोटी रुपये खर्चून केलेला चित्रपट चालावा यासाठी सलमानची धडपड सुरू आहे. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी अर्थात जाहिरातबाजीसाठी सलमानने जेकब अँड कंपनीने तयार केलेले राम जन्मभूमी येथील राम मंदिराचे आणि हनुमान गढीच्या बजरंग बलीचे चित्र असलेले मनगटी घड्याळ वापरुन फोटोशूट केले. या फोटोशूटवरुन वाद सुरू झाला आहे.

सलमान खानने राम जन्मभूमी येथील राम मंदिराचे चित्र असलेले घड्याळ वापरल्यामुळे धर्मगुरु आणि कट्टर मुसलमान भडकले आहेत. अखिल भारतीय मुस्लिम जमातचे अध्यक्ष आणि बरेलीतल्या मुसलमानांचे धर्मगुरु मौलाना शहाबुद्दीन रझवी यांनी सलमानच्या कृतीचा निषेध केला. सलमान खानने राम मंदिराचे चित्र असलेले घड्याळ घालून इस्लाममध्ये निषिद्ध असलेली कृती केल्याचे रझवी म्हणाले.

जर मुसलमानांना स्वाभिमान असेल आणि ते मुसलमान असतील तर त्यांनी सलमानचा चित्रपट बघू नये; असे आवाहन कट्टर मुसलमान अशी ओळख मिरवणाऱ्या मिर्झा बेगने केले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जेकब अँड कंपनीने राम मंदिराचे चित्र असलेली फक्त ४९ घड्याळं तयार केली. यातील एक घड्याळ सलमानला त्याची आई सुशीला चरक म्हणजेच सलमा खान यांनी भेट म्हणून दिले आहे. राम मंदिराचे चित्र असलेले एक घड्याळ अभिषेक बच्चन पण वापरत आहे.

# भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समितीच्या महिला सांस्कृतिक कार्यकमाच्या अध्यक्ष पदी सविता लोढा तर कार्याध्यक्षपदी तनुजा गांधी यांची निवड

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव १० एप्रिल रोजी साजरी करण्यात येणार असुन महिला सांस्कृतिक समितीच्या वतीने विविध सामजिक व सांस्कृतिक कार्यकमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी समितीचे गठन करण्यात आले.

सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा,व महावीर जन्मकल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख व प्रमुख मार्गदर्शिका भारती बागरेचा, करूणा साहुजी, भावना सेठीया, मंगल पारख, कविता अजमेरा, मधु जैन, मेघा सुगंधी, संगीता संचेती, सारीका साहुजी,ललीता साकला, मनिषा भंसाली, मिना पापडीवाल, डिपल पगारीया, मंजु पाटणी, वैशाली धोगडे, मिनाश्री उदगीरकर, अनिता पहाडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सांस्कृतिक समितीच्या अध्यक्ष पदी सविता लोढा, कार्याध्यक्ष तनुजा गांधी, सचिव निता गादीया, ममता जैन, मनिषा पाटणी, कांता धोका, तर कोषाध्यक्ष पदी कलाबाई आचलिया,



अध्यक्षा सविता लोढा | कार्याध्यक्षा तनुजा गांधी | सचिव ममता जैन | सचिव मनिषा पाटणी | सचिव निता गादीया



अध्यक्षा सविता लोढा | कार्याध्यक्षा तनुजा गांधी | सचिव ममता जैन | सचिव मनिषा पाटणी | सचिव निता गादीया

आशा कासलीवाल, भारती संघवे, प्रिती साहुजी, सहसचिव पदी कविता संचेती, सुनिता छल्लानी, शिला संघवी, विदया मेहेत्रे यांची निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष पदी भारती बाकलीवाल, पल्लवी शहा, स्वाती मलारा, निता ठोले,सुप्रिया सुराणा मंजुषा साहुजी, किरण पांडे, प्रभा पगारीया, वंदना चोरडिया, नंदा मुनोत, सुरेखा पाटणी, प्रतिभा सावलकर, विमलराणी बाफना, प्रिती सेठीया, वर्षा साहुजी, चंदा चुडीवाल, जयश्री गुजराणी, प्रिया लोढा, प्रणित अन्नदाते, वंदना डोसी, दिपीका देवडा, अनुपमा दगडा, शोभा अजमेरा, संगीता जैन, नंदा मुथा, सुनिता सेठीया, मोना गांधी, चंदा कासलीवाल, राशी साहुजी, अर्चना साहुजी, नंदा साहुजी, वंदना कासलीवला, विदया खिवंसरा, रेवती गंगवाल, साधना शहा, शकुंतला जैन, तर सदस्य पदी कमलाबाई ओस्तवाल, राखी बोरा, मंगल क्षिरसागर, पुष्पा बाफना, पुजा देसरडा, सिमा पाटणी, लता महाजन, रूपाली रावका, प्रभा पगारीया, प्रतिभा पाटणी, सरोज काला, रफ्पाली चोरडिया, श्रृतिका साहुजी, पिंकी जैन, मंगल कासलीवाल, प्रसन्ना जैन, लता सेठीया, सन्मती सेठीया, रफ्पाली लोहाडे, वैशाली छाबडा, अंजु छाजेड, वैशाली देवडा, मधु बोरा, रफ्पाली कुकुलोळ, मयुरी गुगळे, शिला कोठारी, चंचल चोपडा, प्रिती साहुजी, रिता साहुजी, रोशनी साहुजी, शित कटारीया, सिमा कटारीया, प्रिया लोढा, संतोष कोल्हानी, रंजन दुग्गड, ज्योती चोरडिया, ममता धोका, सपना नहार, नंदा मुनोत, संगीता गगवाल, संगीता सेठी, अनिता पाटणी, उषा क्षिरसागर, शिल्पा रोकडे, नंम्रता साहुजी, मिना कांकरिया, निलम साहुजी, प्रियंका साहुजी, संगीता सुराणा, अंजना जैन, प्रिती भंडारी, स्वाती क्षिरसागर, वैशाली फुलसुले, अर्चना मुगदिया, किर्ती कासलीवाल, योगीता साहुजी, लता बोरा, स्वरफ्पा शहा, पल्लवी शहा, रिया जैन तर सल्लगार समिती पदी सिमा झांबड, राखी देसरडा, हेमलता मुगदिया, सुनिता देसरडा, अल्पा जैन, हर्षमाला पाटणी, वासंती काळे, निर्मला मुथा, पुष्पा गंगवाल, अनिला ठोले यांची निवड करण्यात आली. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# महिला बचतगटांच्या शेतमालाची निर्यात प्रेरणादायी - निलेश सागर



**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यभरातील महिलांच्या शेतकरी उत्पादक कंपनी, स्वयंसहाय्यता बचत गट यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळण्यासाठी आणि ग्रामीण महिलांचे जीवन समृद्ध होण्यासाठी उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यरत आहे. माहिला बचत गटाच्यां शेतमालाची होत असल्याली निर्यात ही निश्चित प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर यांनी केले.

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, एपिडा आणि एक्सिम फार्मर इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर तालुक्यातील शिवस्वराज शेतकरी महिला उत्पादक कंपनीचा शेवगा दुबईला निर्यात करण्यात आला, शेवगा घेऊन जाणाऱ्या कंटेनरला उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून आज शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमासाठी, अतिरिक्त संचालक परमेश्वर राऊत, एपिडा चे उप महाव्यवस्थापक नागपाल लोहकरे, अवर सचिव धनवंत माळी, उपसंचालक मंजिरी टकले, संदीप जठार, एक्सिम फार्मर इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे चेअरमन प्रवीण वानखडे, अभियान व्यवस्थापक ज्योती पवार, शिवस्वराज शेतकरी उत्पादक कंपनीच्या अध्यक्ष व सर्व संचालक मंडळातील महिला उपस्थित होत्या.

अभियानाच्या दृष्टीने आजचा दिवस मैलाचा दगड ठरणारा आहे, उमेद अभियानाच्या अंतर्गत कार्यरत महिलांच्या शेतमालाला योग्य मोबदला मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्न होत आहेत. एक्सिम फार्मर इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री आणि एपिडा यांच्या मदतीने आज पहिला कंटेनर दुबईला जात आहे. शेतमाल निर्यात करण्यासाठी राज्यस्तरावर आणि जिल्हास्तरावर कोल्ड स्टोरेजची व्यवस्था मिळिवण्यासाठी राज्य आणि केंद्र शासनाचे विविध विभागासोबत समन्वय साधण्यात येत असल्याचे श्री. सागर यांनी सांगितले. यावेळी अभियानाचे अतिरिक्त संचालक परमेश्वर राऊत, एपिडाचे उप महाव्यवस्थापक नागपाल लोहकरे, एक्सिम फार्मर इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे चेअरमन प्रवीण वानखडे यांनी मनोगत व्यक्त केले. शिवस्वराज्य शेतकरी महिला उत्पादक गटाच्या अध्यक्ष श्रीमती कौशल्य शंकर जाधव म्हणाल्या की, शेवग्याचे उत्पादन स्थानिक बाजारपेठे पेक्षा जास्त दराने निर्यात होत असल्यामुळे सर्व महिलांना आनंद होत आहे. आम्ही आता आमच्या भागातील महिलांना निर्यात होऊ शकणाऱ्या शेती उत्पादनाचा आग्रह करणार आहे.

# विमानतळ प्रांगणात बुद्ध मुर्तीची प्रतिष्ठापना व लोकार्पण उत्साहात

## जनकल्याणासाठी सगळ्यांचा सहयोग आवश्यक-उद्योगमंत्री उदय सामंत






**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जनसामान्यांच्या कल्याणासाठी शासन सर्व समाज घटकांना सोबत घेऊन काम करत आहे. बुद्धा पुढे नतमस्तक होऊन जनकल्याणाच्या प्रयत्नात सगळ्यांनी सहयोग द्यावा,असे आवाहन आज उद्योग मंत्री उदय सामंत यांनी येथे केले.

येथील विमानतळाच्या प्रांगणात 'भिमता' (Buddhist Indusatrial Maufacturers And Traders Association) या संस्थेच्या वतीने साकारण्यात आलेल्या बुद्ध मुर्तीची प्रतिष्ठापना व लोकार्पण सोहळ्यासाठी श्री.सामंत आले होते. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागासवर्ग कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे, भिमता चे अध्यक्ष मिलिंद थोरात आदी यावेळी उपस्थित होते.

**प्रशिक्षण केंद्राला जागा देणार– उद्योगमंत्री सामंत**

श्री. सामंत म्हणाले की, जगाला अहिंसेचा संदेश भगवान बुद्धांनी दिला. जनतेचे दुःख दुर करण्यासाठी त्यांनी खडतर तप केले. अशा या बुद्धा पुढे नतमस्तक होऊन सगळ्यांनी शासनाने समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन जे जनकल्याणाचे कार्य आरंभले आहे त्यात आपला सहयोग द्यावा. लोकांना त्रास देऊन, बदनामी करुन काहीही साध्य होत नाही. जातीवर नव्हे कर्तृत्वावर श्रेष्ठत्व ठरत असतं. शासन अशा सर्व समाज घटकांसोबत आहे.

उपेक्षितांच्या कल्याणासाठी प्रयत्न करीत आहे, असे त्यांनी सांगितले. 'भिमता', संस्थेला प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी जागा देण्यासंदर्भात लवकरच मान्यता प्रदान करु अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली. तसेच 'भिमता' या संस्थेने बुद्ध मुर्ती स्थापनेसाठी केलेले प्रयत्न व संस्थेचे उद्योग क्षेत्रातील कार्य याबद्दल त्यांनी प्रशंसोद्गारही काढले.

**भगवान बुद्धांचे विचार अंमलात आणा– इमाव कल्याण मंत्री सावे**

श्री.सावे म्हणाले की, भगवान बुद्धांचे शांतीचे विचार प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी आपल्या सगळ्यांना प्रयत्न करायचे आहेत. येथे येणारा प्रत्येक प्रवासी शहरात येतांना या बुद्धमुर्तीकडे पाहून शांतीचे विचार घेऊन येईल.

भगवान बुद्धांच्या कार्याची माहितीही याठिकाणी प्रदर्शित करावी,अशी सुचना त्यांनी केली.

**विकासासाठी शांतता आवश्यक– पालकमंत्री शिरसाट**

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की. बुद्ध मुर्तीचे अनावरण झाले, ही आनंदाची बाब आहे. बुद्धाचे शांती आणि करुणेच्या विचारांची प्रेरणा आपण साऱ्यांनी घ्यायला हवी. येथे येतांना या मुर्तीला वंदन करुन शांततेचा भाव मनात जागृत करुनच लोक शहरात येतील.

अशी शांतता प्रस्थापित करणे हे विकासासाठी अत्यंत आवश्यक असते,असे प्रतिपादनही पालकमंत्री शिरसाट यांनी केले.

भदंत बोधीपालो महाथेरो व भिक्खु संघाच्या वतीने प्रतिष्ठापना, पूजन आणि धम्मदेसना करण्यात आली तसेच भिक्खुंना मान्यवरांच्या हस्ते चिवरदान करण्यात आले. बुद्धिस्ट इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरस अँड ट्रेडर असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष मिलिंद थोरात, सुभाष मुदगावकर, प्रवीण कुमार वसाते, सिद्धार्थ जाधव, बाळासाहेब पठारे, सूर्यकांत कोटकर, रामचंद्र पठारे, सुभाष मोरे विनोद अवसरमल, प्रमोद राऊत, संदीप केदारे आदी यावेळी उपस्थित होते. मिलिंद बागुल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### अशी आहे बुद्धमूर्ती !

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अजिंठा-वेरूळ लेण्यांमधून बौद्ध संस्कृतीचे दर्शन होते. जगभरातून येथे येणाऱ्या पर्यटकांना शहराच्या ऐतिहासिक वारशाची जाणीव व्हावी, यासाठी विमानतळावर भव्य बुद्धमुर्ती उभारण्याची कल्पना पुढे आली. 'भिमता' संघटनेच्या सदस्यांनी हा प्रस्ताव विमानतळ प्राधिकरणाकडे सादर केला. ११ जानेवारी २०२३ रोजी या प्रस्तावाला मंजुरी मिळाली. तेलंगणातील आलागड्डा येथे १५.५ फ ूट उंच आणि अखंड बेंगलोरी ग्रॅनाइटमध्ये अभयमुद्रा असलेली बुद्धमूर्ती तयार करण्यात आली. ही बुद्धमूर्ती ५ मे २०२३ रोजी बौद्ध पौर्णिमेच्या पवित्र दिवशी स्थानापन्न करण्यात आली होती. त्यानंतर संपूर्ण परिसराचे सुशोभिकरण करून आज लोकार्पण करण्यात आले.

# छत्रपती संभाजीनगर कारागृहाला प्रधान सचिव राधिका रस्तोगी यांची भेट

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गृह विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती राधिका रस्तोगी यांनी छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहाला गुरुवारी (दि.२७) भेट दिली. या वेळी विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) डॉ.जालिंदर सुपेकर, मध्यवर्ती कारागृह अधीक्षक धनराज गवळे तसेच वरिष्ठ तुरुंगाधिकारी उपस्थित होते.

यावेळी श्रीमती रस्तोगी यांच्या हस्ते कारागृह परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर नव्याने बांधकाम केलेल्या महिला कारागृहाच्या इमारतीची पाहणी श्रीमती रस्तोगी यांनी केली. महिला कैद्यांसाठी उपलब्ध असलेल्या ई-मुलाखत सुविधा, हेल्पलाइन, तसेच कल्याणकारी योजनांची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग कक्षाची पाहणी करून न्यायालयीन कामकाजाची माहिती घेतली. कारागृहातील सुरक्षा यंत्रणा, स्वच्छता व्यवस्थापन, आणि बंदीवासीयांना दिल्या जाणाऱ्या विविध सुविधांचा आढावा घेतला.

कारागृहातील गरीब व दुर्बल कैद्यांना न्याय मिळावा यासाठी 'डीर्ीींीं ीं झ्री झीळीपशी डलहशाश' अंतर्गत आवश्यक मदत दिली जावी, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच, कारागृहातील कैद्यांना कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या योजना राबवाव्या असे निर्देश त्यांनी दिले.

# शालेय विद्यार्थ्यांच्या सोबत प्रा. मिलिंद ठोकळे यांचा वाढदिवस साजरा



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला महाविद्यालय बिडकीन येथील समाजभिमुख व्यक्तिमत्व प्रा. मिलिंद ठोकळे यांचा ५० वा वाढदिवस साजरा करण्यात आला. समाजातील गोरगरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांना मदतीचा हात म्हणून महानगरपालिका प्राथमिक शाळा नक्षत्र वाडी येथील शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. तसेच वाढदिवसानिमित्त सामाजिक दायित्व म्हणून महिला महाविद्यालयाचे प्रा. जितेंद्र शेजवळ सर यांनी रोख रक्कम तीन हजार रुपये विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर बक्षीस दिले.

यावेळी प्रा. अनिल गवळे, डॉ. रमेश गायकवाड, बाबासाहेब बोरुडे, शाळेचे मुख्याध्यापक भगवान साळुंखे, शिक्षक भरत बर्डे, कल्पना पाटील, राधिका राजपूत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# दि.२ एप्रिल रोजी जिल्ह्यात 'कन्या दिन' साजरा होणार

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यात मुला-मुलींच्या असमान प्रमाणामुळे चिंतेची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मुलींच्या जन्मदर वाढविण्यासाठी आणि झउझछउऊ कायद्याचा व्यापक प्रसार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिलेल्या निर्देशानुसार, बुधवार दि.२ एप्रिल रोजी प्रत्येक ग्रामपंचायतस्तरावर 'कन्या दिन' साजरा करण्यात येणार आहे. याबाबत तालुका, उपविभागीय पातळीवरील अधिकाऱ्यांनी नियोजन करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जाणार आहे. 'बेटी बचाओ अभियाना'ला गती देण्यासाठी आणि मुलींच्या जन्माचे महत्त्व समाजात रुजवण्यासाठी यानिमित्त विविध उपक्रम राबवले जातील.

**महत्त्व आणि उद्दिष्टे:**

PCPN DT कायद्याची जनजागृती

मुलगी जन्माला यावी यासाठी समाजप्रबोधन, लिंगनिदान चाचण्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी जनजागृती, ग्रामपंचायत स्तरावर 'बेटी बचाओ' चळवळीला चालना, महिला आणि मुलींच्या सन्मानासाठी विशेष कार्यक्रम

**कार्यक्रमाचे आयोजन:**

मंगळवार दि. १ एप्रिल रोजी तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि आरोग्य अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येईल.

तसेच दि.३०, ३१ मार्च आणि १ एप्रिल या तारखांना गावोगावी कार्यक्रमाची पूर्वतयारी करण्यात येईल. कार्यक्रमादरम्यान महिला आणि बालिकांच्या प्रगतीवर व्याख्याने, मार्गदर्शन सत्रे, सांस्कृतिक स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आणि महिला आरोग्यावर चर्चा यांसारखे उपक्रम राबवले जातील. विशेषतः मुलींच्या शिक्षणास चालना देणाऱ्या आणि सामाजिक योगदान देणाऱ्या महिलांचा सत्कार केला जाईल.

# मालकीच्या शेतजमिनीवर अन्याय; शेतकरी जयाबाई घुसळे यांचे तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू

**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील सुलिभंजन येथील शेतकरी जयाबाई बाबासाहेब घुसळे यांनी आपल्या शेतजमिनीवर अन्याय झाल्याचा आरोप करत तहसीलदार कार्यालया समोर आजपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. जया बाई घुसळे यांचा आरोप आहे की, गट क्रमांक ४३ ही जमीन त्यांच्या मालकीची असतानाही कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित अधिकाऱ्यांनी पंचनामा केला. त्यांच्यावर बेकायदेशीर उत्खननाचा खोटा आरोप ठेवला असून, या प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम २४७ अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.घुसळे यांनी प्रशासनाकडे फेरमोजणी करून सत्य परिस्थिती समोर आणण्याची मागणी केली आहे. त्यांच्यावर लावलेला आरोप चुकीचा असून, योग्य तपासणी न करता कारवाई करण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे. गुरुवारी सकाळ पासून तहसील कार्यालया समोर त्यांनी शांत तापूर्ण पद्धतीने उपोषण सुरू केले. स्थानिक शेतकरी आणि नागरिकांनी त्यांना पाठिंबा दर्शवला आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन योग्य न्याय द्यावा, अशी मागणी उपोषणकर्त्या जयाबाई घुसळे यांनी केली आहे.

# मंजुर विकास आराखड्यामुळे व्यवसायिक आनंदी झाले सामान्यहो आत्ताच व्यक्त होऊ नका- डॉ.राजेंद्र दाते पाटील यांचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

समाजाच्या गरजाशी संवेदनशीलता निर्माण करणे म्हणजे प्रारूप विकास आराखडा असा अपेक्षित आशय असल्यामुळे सध्या मंजुर विकास आराखडा मंजुरी नंतर समस्त व्यवसायिक आनंदी झाले आहेत त्यामुळे आत्ताच व्यक्त होऊ नका असे आवाहन जन आंदोलन विकास कृती समिती, महाराष्ट्रचे अध्यक्ष आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ .राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

डेव्हलपमेंट ॲक्शन प्लॅन हे एक संरचित दस्तऐवज किंवा साधन आहे जे व्यावसायिक किंवा इतर सर्वच उन्नती तथा वाढीसाठी एखाद्या व्यक्तीची उद्दिष्टे आणि ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या विशिष्ट पावले किंवा कृतींची रूपरेषा देतात.यात सामान्यत: प्रगतीचे मूल्यमापन करण्यासाठी टाइम लाइन, आवश्यक संसाधने,संभाव्य आव्हाने आणि मोजता येण्याजोग्या परिमाणांचा समावेश असतो.

१९९१ च्या मंजूर आराखड्यातील नकाशे आणि प्रारूप विकास आराखड्यातील नकाशां मधील तांत्रीक चुका मुळे गट आणि सर्व्हे नंबरच्या क्षेत्रफळा मध्ये मोठी तफावत निर्माण झाली असुन याचा परिणाम आता रस्त्यांची आखणी विकास परवानगी, रेखांकनाला मंजुरी देताना अडचणी निर्माण होणार असल्याची बाब आपण



आक्षेप नोंदवताना घेतलेला आहे.

६ मार्च २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला असुन सदरचा प्रारूप विकास आराखडा तयार करताना इ.एल.यू. एक्झीस्टिंग लॅड यूज म्हणजे अस्तिवात जमीन वापर नकाशा हा विचारत घेता सध्या या जमिनीचा वापर रहिवासी क्षेत्र,क्रीडांगण,स्मशान भुमी,कब्रिस्थान,शाळा,रस्ता,बगीचा व इतर काय उपक्रम अस्तित्वात आहे या सर्व बाबी विचारात न घेता किंवा या बाबत काही एक अभ्यास केल्या शिवाय पी.एल.यू. प्रपोज्ड लॅड यूज म्हणजे भविष्यासाठी प्रस्तावीत करावयाचा अस्तित्वा तील जमीनीचा वापर प्रस्तावीत असलेला नकाशा म्हणजे हा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या नकाशातील परिमाण मोजमापा मध्ये प्रचंड अनेक दुरोगामी परिणाम करणाऱ्या तांत्रीक चुका जाणुन बुजुन करण्यात आल्या असुन या परिणामांचा योग्य वापर केलेला नसल्यामुळे गट आणि सर्व्हे नंबर मधील परीमाणा मधील लांबी व रुंदी परिणामतः प्रचंड अयोग्य बाबी व चुका झाल्या असुन प्रारूप आराखडा तयार करतांना प्रस्तावित नकाशांचा दर्शविण्यात आलेला परिमाण आणि यापूर्वी १९९१ मधील मंजूर नकाशा तील परीणाम यामध्ये तफावत आली आहे. या तफावतीमुळे विकास आराखड्या तील रस्त्यांची आखणी,विकास परवानगी, रेखांकन मंजुरी आणि इतर तत्सम परवानगी देतांना चुकलेल्या या बाबींचा नक्कीच परिणाम होणार असल्याची गंभीर तक्रार आपण नोंदवलेल्या असुन आता नक्की कशास मंजुरी दिली तो नकाशा पाहिल्या शिवाय समिती पैकी कृपया कोणीही व्यक्त होउ नये असेही आवाहन जन आंदोलन विकास कृती समिती, महाराष्ट्रचे अध्यक्ष आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

•Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 •Email : attalsanket2023@gmail.com •RNI No. MAHMAR/2023/87816